MHRG110008342024

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.०४/२०२४**

**(कियारा खाडे विरुध्द किरण खाडे)**

## अर्ज निशाणी क्र.०६ वर आदेश

अर्जदारने प्रस्तुत अर्ज महिलांचा घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण कायदा सन २००५ मधील कलम २३ अन्वये अंतरिम आदेश सामनेवाला क्र.१ यांचेकडून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदारने असे कथन केले आहे की, अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दिनांक १६.०५.२०२३ रोजी मौजे कर्नाळा, ता.तळा, जि.रायगड येथे झालेला आहे. विवाहानंतर अर्जदार व सामनेवाला क्र.१ हे मुंबई येथे रहावयास गेले. लग्नानंतर काही दिवस संसार सुखाचा झाला. परंतु, सामनेवाला क्र.१ यांचे घर हे झोपडपट्टीमध्ये असल्यामुळे अर्जदार हिस तेथे वास्तव्य करणे अवघड जात होते. अर्जदाराने भाडेतत्वावर दुसरीकडे राहण्याची चर्चा केली असता, सामनेवाला क्र.१ याने तुला ह्याच रुममध्ये रहावे लागेल, हेच माझे घर आहे, मी दुसरीकडे राहु शकत नाही असे म्हणून दुर्लक्ष केले.

३. सामनेवाला क्र.२ या अर्जदार हिस तुला कोणतेही घरकाम व्यवस्थित करता येत नाही असे म्हणून मानसिक छळ करीत असत. सामनेवाला क्र.१ यांचे मुंबई येथील घर हे झोपडपट्टीमध्ये असल्यामुळे तेथे बाथरुमची सोय नव्हती त्यामुळे अर्जदार हिची गैरसोय होत असे. सामनेवाला क्र.१ हा अर्जदार हिचेवर हात उचलणे,

मारहाण करणे, शिवीगाळी करणे असे प्रकार करत असे. सामनेवाला क्र.१ ने अर्जदार हिस तिचे माहेरी निघुन जा असे सांगुन तीस जबरदस्तीने घराबाहेर काढले. तेव्हापासुन अर्जदार ही तिचे माहेरी राहत आहे. अर्जदार हिची माहेरची परिस्थती अत्यंत हालाखीची आहे. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिस कधीही कोणत्याही प्रकारे संपर्क करण्याचा प्रयत्न केला नाही व घरी परत नेण्यास आला नाही. पालनपोषणाकरिता, औषधोपचाराकरिता व इतर खर्चासाठी पैसे दिले नाहीत व पत्नी म्हणून अर्जदार हिची कोणत्याही प्रकारे विचारपुस केली नाही.

४. सामनेवाला क्र.१ हा अंधेरी, मुंबई येथे नोकरीस असून वार्षिक उत्पन्न रक्कम रु.३,००,०००/- इतके उत्पन्न मिळते. अर्जदार हिस कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदार यांनी सामनेवाला क्र.१ यांचेकडून मुलभूत गरजा भागविण्यासाठी दरमहा रक्कम रु.१५,०००/- अंतरिम पोटगी व अर्जदार हिच्या राहण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी अशी मागणी केली आहे.

५. सामनेवाला यांनी सदर अर्जास कोणतेही म्हणणे दिलेले नाही. अर्जदार यांचे विद्वान विधीज्ञ यांचे युक्तिवाद ऐकले. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले.

६. सामनेवाला यांनी अर्जदारांसोबतचा विवाह व त्यांचे नाते नाकारले नाही. प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अर्जदार व सामनेवाला यांचे वैवाहिक संबंध आजपर्यंत कायम आहे. अर्जदार ही माहेरी कर्नाळा, ता.तळा येथे राहते. तसेच सामनेवाला क्र.१ यांना नोकरी असल्याचे अर्जदाराने कथन केले आहे.

७.        अर्जदारने अर्जामध्ये तसेच शपथपत्रामध्ये स्पष्ट कथन केले आहे की, सामनेवाला क्र.१ हे अर्जदार हिला शिवीगाळ, मारहाण करीत होता. त्यामुळे अर्जदाराला शारिरीक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले. अर्जदाराचे सदर कथन सामनेवाला यांनी नाकारलेले नाही. त्यामुळे सदर तक्रारीच्या अवलोकनावरुन प्रथमदर्शनी स्पष्ट होते की, अर्जदाराने सामनेवाला क्र.१ अर्जदार हिस शिवीगाळ, मारहाण केली. अर्जदाराने हिंसाचाराबाबत कथन केलेल्या ब–याच घटनावरुन व तक्रारीवरुन प्रथमदर्शनी असे सिध्द होते की, सामनेवाला यांनी अर्जदाराला टोमणे देवुन हिन दर्जाची वागणूक देऊन अपमानास्पद वागवले. तसेच सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदाराला मारहाण केल्याचे प्रथमदर्शनी दिसते. सदर अत्याचारावरुन प्रथमदर्शनी स्पष्ट होते की, अर्जदाराला मानसिक, भाविनक व शारिरीक कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागले आहे.

८.        सामनेवाला क्र.१ याने अर्जदारांना अन्नवस्त्र खर्च दिल्याचे सांगितलेले नाही. सामनेवाला यांनी असेही सांगितले नाही की, त्यांनी अर्जदारांच्या वास्तव्यासाठी स्वतंत्र प्रयोजन केले आहे. अर्जदार ही माणगांव येथे राहते. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ कलम ३ प्रमाणे आर्थिक संसाधनपासून पिडीत व्यक्तीला वंचित ठेवणे हे 'घरगुती हिंसाचार' च्या व्याख्येत मोडते.

९.        अर्जदारला अन्नवस्त्र खर्च देण्याची प्राथमिक जबाबदारी सामनेवाला क्र.१  यांची आहे. अर्जदार यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय ***रजनेश विरुध्द***

***नेहा २०२१ एस.सी.सी ३२४*** मधील निर्देशाप्रमाणे दाखल केलेल्या दायित्वाबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केले नाही. सामनेवाला यांनी देखील उत्पन्नाबाबत तसेच दायित्वाबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केले नाही. तसेच सामनेवाला यांनी अर्जदाराला स्वतंत्र उत्पन्नाचे साधन असल्याबाबत कथन केले नाही.

१०. अर्जदाराचे कथन नाकारले नसल्यामुळे अर्जदार यांचे उदरनिर्वाह खर्च, वैद्यकीय खर्च तसेच, वाढत्या महागाईचा विचार केला असता अर्जदारला सामनेवाला क्र.१ यांच्याकडून दरमहा रक्कम रु.३०००/-(रुपये तीन हजार मात्र) प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून मंजूर करणे न्यायोचित होईल.

११. अर्जदार यांच्या राहण्याची स्वतंत्र व्यवस्था सामनेवाला क्र.१ यांनी करावी अशी अर्जदाराने मागणी केली आहे. परंतु अर्जदाराने ती भाड्याने राहते व त्याबाबत कोणताही पुरावा अथवा भाड्याची रक्कम याबाबत कथन केले नाही. तसेच तिच्या राहण्याची सोय कोठे व कशी करायची याबाबत स्पष्टपणे उल्लेख केलेला नाही. अभिलेखावर भाड्याने राहत असल्याबाबत व भाड्याच्या रक्कमेबाबत प्रथमदर्शनी पुरावा नाही. म्हणून सदरची मागणी ही अंतिम निकालाच्या वेळी पुराव्याअंती निश्चित करण्यात येईल.

१२. उपरोक्त कारणमिमांसेवरुन अर्ज अंशतः मंजूर करण्या योग्य आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**MHRG110008342024**

## <u>आ दे श</u>

**अ.** प्रस्तुत अर्ज खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येतो.

**ब.** सामनेवाला क्र.१ यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदाराला अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रुपये ३,०००/- (रुपये तीन हजार मात्र) दरमहा अंतरिम अर्जाच्या दिनांकापासून म्हणजेच दि.२९.११.२०२४ रोजीपासून मूळ अर्जावर न्यायनिर्णय होईपर्यंत द्यावे.

**क.** अर्जदाराच्या इतर मागण्या या अंतिम निकालावेळी विचारात घेण्यात येतील.

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2026.07.04 17:59:18 +0530

माणगाव. **[श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]**

दिनांकः-०४.०७.२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.

**MHRG110008342024**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | A. V. Chavan |
| Name of the Court | :- | Smt. A. P. Manav,<br>Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Mangaon. |
| Date of decision | :- | 04.07.2026 |
| Order signed by P.O. on | :- | 04.07.2026 |
| Order uploaded on | :- | 04.07.2026 |